# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ फॅक्स क्रमांक : ०७१२-२५६१६६३

E-mail:ronagpur.dte@gmail.com Website:www.rdtenagpur.org.in

तात्काळ स्मरणपत्र

क्रमांक:तंशिसं/विकाना/का-३/आस्था/म.त.नि.स./२०१२/2764

दिनांक: 14 SEP 2012

प्रति,

**प्राचार्य,**

**सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित**

**अभियांत्रिकी महाविद्यालये/ तंत्रनिकेतने व तत्सम संस्था**

**विषय :- कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध करण्याकरता महिला तक्रार निवारण समित्यांचे योग्य प्रकारे गठण करणेबाबत...**

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिसं/विकाना/आस्था/२०१२/२२७२, दि.३१/०७/२०१२
२) या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिसं/विकाना/आस्था/२०१२/२३८३, दि.०८/०८/२०१२
३) या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिसं/विकाना/आस्था/२०१२/२५७७, दि.२८/०८/२०१२

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये महिला तक्रार निवारण समितीचे योग्य प्रकारे गठन करण्याबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. तथापि बऱ्याचशा संस्थांमध्ये अद्यापही अशाप्रकारे गठीत करण्यात आलेल्या समित्यांच्या प्रति या कार्यालयांस प्राप्त झालेल्या नाहीत. संदर्भ क्र. ३ अन्वये महिला तक्रार निवारण समित्यांचे योग्य प्रकारे गठन करणेबाबतचे शासनपत्र व बाल विकास विभागाचे दिनांक ११/०६/२०१० व दिनांक ०४/१०/२०१० चे परिपत्रक **या कार्यालयाचे www.rdtenagpur.org.in या संकेतस्थळावर Download सेक्शनमध्ये आपणांस उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.**

तरी आपणांस कळविण्यांत येते की, सदर शासनपत्र व बाल विकास विभागाचे शासन परिपत्रके यांचा योग्यप्रकारे अवलोकन करुन त्यात दिलेल्या सुचनेप्रमाणे **आपल्या संस्थेमध्ये महिला तक्रार निवारण समिती स्थापन करुन त्याबाबतच्या आदेशांची प्रत तसेच योग्यप्रकारे महिला तक्रार निवारण समिती स्थापन झाल्याबाबतचे प्रमाणपत्र फॅक्स / मेलव्दारे तात्काळ या कार्यालयांस सादर करावे.**

तसेच **माहे ऑगस्ट, २०१२ अखेर पासून विवरणपत्र १ व २ मध्ये प्रत्येक महिन्याची माहिती त्यापुढील महिन्याच्या ३ तारखेच्या आंत या कार्यालयांस सादर करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये यापूर्वीच आपणांस कळविण्यात आलेले आहे. परंतु सदरहू माहिती अद्याप पर्यंत अप्राप्त आहे. तरी माहिती तात्काळ फॅक्स / मेल व्दारे या कार्यालयांस सादर करण्यात यावी.**

( गुलाबराव ठाकरे )
**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर**

**प्रत :** प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना आवश्यक कार्यवाहीकरीता. त्यांनी उपरोक्त पत्र या कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करावे व संबंधित संस्थांना मेल करावे.